विकसित भारत-रोजगार व आजिविका हमी मिशन (ग्रामीण) योजनेशी विविध योजनांच्या अभिसरणातुन व राज्य रोजगार हमी योजनेतुन मातोश्री ग्रामसमृध्दी शेत/पाणंद रस्ते योजना सुरु ठेवणेबाबत...

महाराष्ट्र शासन

मृद व जलसंधारण विभाग (रोहयो प्रभाग)

शासन निर्णय क्रमांक- रोहयो-२०२६ / प्र.क्र.४३ /रोहयो-६

१६ वा मजला, नवीन प्रशासन इमारत,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,

दिनांक : १७ नोव्हेंबर, २०२६

संदर्भ :-

१) शासन निर्णय, नियोजन विभाग (रोहयो प्रभाग), क्र.मग्रारो-२०२१/ प्र. क्र.२९/ रोहयो-१०अ, दिनांक ११ नोव्हेंबर, २०२१.

२) शासन निर्णय, नियोजन विभाग (रोहयो प्रभाग), क्र.मग्रारो-२० २४/ प्र. क्र.०८/ रोहयो-१०अ, दिनांक ९ फेब्रुवारी, २०२४.

३) विकसित भारत: रोजगार व आजिविका हमी मिशन (ग्रामीण) अधिनियम, २०२५

४) केंद्रीय ग्रामीण विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. जे-१६०१९/०३/२०२५-आरआय (पीटी.) (३९४१६०), दिनांक ३० जुलै, २०२६.

५) ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांची अधिसुचना दिनांक ११ मे, २०२६

६) मा. मंत्रीमंडळ बैठक दि.२७.१०.२०२६ चे इतिवृत्त दि. ०४.११.२०२६.

प्रस्तावना :-

शेतीच्या कामांकरीता मनुष्यबळाच्या कमी उपलब्धतेमुळे शेतीमध्ये पेरणी, आंतरमशागत, कापणी, मळणी व इतर कामांकरीता यांत्रिकीकरण आवश्यक झाले आहे. तसेच, शेती व्यवसाय किफायतशीर होण्यासाठी शेतातुन पिकांची योग्य वेळी काढणी होऊन शेतमाल योग्यवेळी बाजारात पोहचविणे देखील अगत्याचे झाले आहे. शेती व्यवसाय किफायतशीर होण्यासाठी पिक पध्दतीतील विविधता, यांत्रिकीकरण, योग्यवेळी शेतमाल बाजारात पोहचविण्यासाठी बारमाही वापराचे शेतरस्ते अपरिहार्य आहेत. शेतरस्ते हे योजनाबाह्य रस्ते असुन सदर रस्त्यांच्या कामांकरीता अन्य योजनांचा निधी उपलब्ध होण्यात अडचणी होत्या. तथापि, राज्यात ग्रामीण भागातील शेत/पाणंद रस्त्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. शिवाय, शेत/पाणंद रस्त्यांच्या कामांकरीता लागणारा निधी केवळ राज्याच्या अर्थसंकल्पीय तरतुदीतुन उपलब्ध करणे देखील शक्य नसल्याने विविध केंद्र व राज्य योजनांचे मनरेगा योजनेशी अभिसरणातुन मातोश्री ग्रामसमृध्दी शेत/पाणंद रस्ते योजना राबविण्यास शासन निर्णय, संदर्भ क्र.१ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर योजनेतील कामांची अंमलबजावणी करतांना सुलभता व स्पष्टता येण्याच्या अनुषंगाने शासन निर्णय, संदर्भ क्र.२ अन्वये योजनेत सुधारणा करण्यात आल्या आहेत.

भारतीय संसदेने पारित केलेल्या "विकसित भारत: रोजगार व आजिविका हमी मिशन (ग्रामीण) अधिनियम, २०२५" हा कायदा दिनांक १ जुलै,२०२६ पासुन देशभरात अंमलात आला आहे. संदर्भ क्र.५ च्या अधिसुचनेन्वये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम, २००५ दिनांक ३० जुन, २०२६ पासुन निरसित करण्यात आल्याने मनरेगा योजना बंद झाली आहे. सबब, मातोश्री ग्रामसमृध्दी शेत/पाणंद रस्ते योजनेंअंतर्गत सुरु असलेली कामे पुर्ण करण्यासाठी आणि सदर योजना यापुढेही सुरु ठेवण्याबाबत सुस्पष्ट धोरण निश्चित करणे आवश्यक झाले आहे.

विकसित भारत: रोजगार व आजिविका हमी मिशन (ग्रामीण) अधिनियम (VB-G RAM G), २०२५ या केंद्रीय कायद्याच्या कलम ३० नुसार ग्रामीण कुटुंबांना अकुशल रोजगाराची हमी देण्यासंदर्भात यापुर्वीच अस्तित्वात असलेला राज्याचा कायदा उपरोक्त केंद्रीय कायद्याशी सुसंगत करुन राज्यांना त्यांचा स्वतंत्र कायदा राबविण्याची मुभा देण्यात आली आहे. तसेच, केंद्रीय कायद्यात विहीत केल्याप्रमाणे अर्थसहाय्य देखील संबधित राज्यास प्राप्त होईल, असे नमुद करण्यात आले आहे.

केंद्रीय कायद्यातील उपरोक्त कलम ३० मधील तरतुदीस अनुसरुन "महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७" या राज्याच्या कायद्यात केंद्रीय कायद्याशी सुसंगत सुधारणा करण्यात आल्या आहेत. त्यानुसार केंद्रीय कायद्यानुसार राज्यास अर्थसहाय्य उपलब्ध होण्यासाठी राज्याच्या कायद्यांतर्गत महाराष्ट्र राज्य व्ही.बी.जी.राम.जी. निधी (VB-G RAM G State fund of Maharashtra) गठीत करण्यात आला असुन केंद्र शासनामार्फत प्राप्त अर्थसहाय्य आणि त्यास समरुप राज्य हिस्सा यांचा समावेश सदर निधीत होतो. तसेच, महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ मध्ये यापुर्वीच रोजगार हमी निधी गठीत करण्यात आला असुन, सदर निधीमध्ये व्यवसाय कराच्या माध्यमातुन मिळणाऱ्या रक्कमेचा भाग, राज्य शासनाचे अनुदान इत्यादी बाबींचा समावेश होतो. महाराष्ट्र रोजगार हमी योजना अधिनियम, १९७७ च्या कलम ३-A मधील तरतुदीनुसार राज्यातील ग्रामीण भागातील सर्व प्रौढ व्यक्तींना अकुशल रोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी "महाराष्ट्र रोजगार हमी (विकसित भारत- रोजगार व आजिविका हमी मिशन (ग्रामीण)) योजना), २०२६ ही योजना अधिसुचित करण्यात आली आहे. त्यानुसार विकसित भारत-जी राम जी या केंद्रीय योजनेचे लाभ राज्यात "महाराष्ट्र रोजगार हमी (विकसित भारत- रोजगार व आजिविका हमी मिशन (ग्रामीण)) योजना" या योजनेंतर्गत राज्यातील ग्रामीण कुटुंबाना देण्यात येत आहेत.

विकसित भारत-जी राम जी ही योजना केंद्र पुरस्कृत योजना म्हणुन राज्यात राबविण्यात येत असल्याने योजना राबवितांना येणाऱ्या अकुशल, कुशल आणि प्रशासकीय बाबी यांवरील खर्चाचा केंद्र आणि राज्य यांचा हिस्सा अनुक्रमे ६०:४० अशा प्रमाणात विहीत करण्यात आला आहे. तथापि, विकसित भारत-जी राम जी या योजनेंतर्गत मार्गदर्शक तत्वानुसार निधीचे मानक वाटप (Normative Allocation) करण्यात येत आहे. सदर मानक वाटपापेक्षा अधिकच्या झालेल्या खर्चाची जबाबदारी देखील संबंधित राज्याची आहे.

विकसित भारत-जी राम जी योजनेंतर्गत विविध विभागाच्या योजनांच्या अभिसरणातुन अनुज्ञेय कामे प्राधान्याने करण्यावर भर देण्यात आला आहे. तथापि, विकसित भारत-जी राम जी या केंद्रीय योजनेसोबत अन्य योजनांच्या अभिसरणातुन कामे करण्यासाठी केंद्र शासनामार्फत संबंधित योजना अधिसुचित होणे आवश्यक आहे. विकसित भारत-जी राम जी या केंद्रीय योजनेसोबत राज्यातील रोजगार हमी योजनेच्या अभिसरणाकरीता उपरोक्त तरतुदीनुसार रोजगार हमी योजना अधिसुचित करण्याची विनंती केंद्र शासनास करण्यात आली होती. त्यानुसार संदर्भ क्र.४ येथील दिनांक ३० जुलै, २०२६ रोजीच्या पत्रान्वये विकसित भारत-जी राम जी या केंद्रीय योजनेंतर्गत अनुज्ञेय कामे अभिसरणांतर्गतही घेण्यास केंद्र शासनाने मान्यता दिली आहे. सदर योजनेंतर्गत एकुण ३७५ कामे अनुज्ञेय करण्यात आली असुन या कामांमध्ये रस्त्यांची कामे देखील अनुज्ञेय आहेत. सबब, या केंद्रीय योजनेसोबत विविध योजनांच्या अभिसरणातुन आणि राज्य रोजगार हमी योजनेतुनही शेत/पाणंद रस्त्यांची कामे करण्यासाठी मातोश्री ग्रामसमृध्दी शेत / पाणंद रस्ते योजना पुढेही सुरु ठेवण्याबाबतच्या विभागाच्या प्रस्तावास दिनांक २७.१०.२०२६ रोजी झालेल्या मा. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. त्यानुषंगाने मातोश्री ग्रामसमृद्धी शेत/पाणंद रस्ते योजना विविध योजनांच्या अभिसरणातुन सुरू ठेवण्याबाबतचा शासननिर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासननिर्णय :

"विकसित भारत: रोजगार व आजिविका हमी मिशन (ग्रामीण) अधिनियम, २०२५" हा कायदा देशभरात दिनांक १ जुलै,२०२६ पासुन अंमलात आला असुन, मनेरगा अधिनियम २००५ निरसित करण्यात आला आहे. त्यामुळे मातोश्री ग्रामसमृध्दी शेत/पाणंद रस्ते योजना यापुढे "विकसित भारत: रोजगार व आजिविका हमी मिशन (ग्रामिण)" या योजनेशी विविध योजनांच्या अभिसरणातुन सुरु ठेवण्यास मा. मंत्रीमंडळाने उक्तप्रमाणे मान्यता दिल्यानुसार पुढील बाबींना शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

१) विकसित भारत-जी राम जी योजनेसोबत विविध योजनांच्या अभिसरणातुन मातोश्री ग्रामसमृद्धी शेत/पाणंद रस्ते योजना सुरू ठेवण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२) मनरेगा आणि विविध योजना यांच्या अभिसरणातुन सुरू असलेली व यापुर्वी शासन मान्यताप्राप्त कामे विकसित भारत- जी राम जी योजनेसोबतच्या अभिसरणातुन पुर्ण करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३) विकसित भारत-जी राम जी योजने अंतर्गत केंद्र शासनाव्दारा विहीत केलेल्या मानकाधारीत अर्थसहाय्याची मर्यादा (Normative Allocation) समाप्त झाल्यानंतर सदर योजनेतील कामे राज्य रोजगार हमी योजनेतुन पुर्ण करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

४) राज्य रोजगार हमी योजना आणि विविध केंद्रीय व राज्य योजनांच्या अभिसरणातुनही शेत/पाणंद रस्त्यांची कामे करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

५) मातोश्री ग्रामसमृध्दी शेत/पाणंद रस्ते योजना सध्या राज्यस्तरीय योजना असुन जिल्हा नियोजन समितीच्या नियतव्ययातुनही कामे करण्यासाठी सदर योजना राज्यस्तरीय योजनेसह जिल्हास्तरीय योजना म्हणुनही घोषीत करण्यात येत आहे.

६) योजनेचा वेळोवेळी आढावा घेऊन योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यक त्या सुधारणा करणे व क्षेत्रीयस्तरावरील अडचणीचे निराकरण करणेसाठी राज्यस्तरीय समितीस अधिकार देण्यात येत आहे.

२. सदर योजनेंतर्गत करावयाच्या कामांचे प्रकार व राज्यांतील विविध भौगोलिक परिस्थितीशी सुसंगत नमुना अंदाजपत्रके, अंदाजपत्रकीय किंमत, तांत्रिक व प्रशासकीय मान्यतेचे अधिकार इत्यादी संदर्भातील सध्या प्रचलीत असलेली कार्यपध्दती / मानके यापुढेही लागु राहतील.

३. विकसित भारत-जी राम जी योजना अंमलबजावणी संदर्भातील विहीत तरतुदीच्या अनुपालनातुन योजनेंअंतर्गत कामे पुर्ण करण्यात येतील याची अंमलबजावणी यंत्रणांनी दक्षता घ्यावी.

४. मातोश्री ग्रामसमृध्दी शेत/पाणंद रस्ते योजनेंतर्गतील कामे पुर्ण करतांना राज्यात एकवाक्यता असावी, कामांची व्दिरुक्ती होऊ नये, कामांना युनिक आयडी घेणे ,खर्चाचे लेखांकन, कामांची निवड व मान्यता,कामे कार्यान्वित करणे इत्यादी बाबींसंदर्भात अंमलबजावणीची मानक कार्यपध्दती (Standard Operating Procedure) यथावकाश शासनस्तरावरुन प्रसिध्द करण्यात येईल.

५. शासन निर्णय, संदर्भ क्र.१ दिनांक ११/११/२०२१ व शासन निर्णय, संदर्भ क्र.२ दिनांक ०९/०२/२०२४ आणि मातोश्री ग्रामसमृद्धी शेत/पाणंद योजनेसंदर्भात शासनस्तरावरुन वेळोवेळी निर्गमित आदेश तसेच मार्गदर्शक सुचना विकसित भारत-जी राम जी योजनेच्या अभिसरणातुन कामे करतानाही योग्य त्या फेरफारांसह यापुढेही लागु राहतील.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६१११७१३२२३२९७२६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by KAILAS TARACHAND SALUNKE
Date: 2026.11.17 13:24:13 +05'30'

(कैलास साळुंके)
शासनाचे सहसचिव

प्रत,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन,मुंबई.
२) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, यांचे सचिव,विधानभवन,मुंबई.
३) मा.अध्यक्ष,महाराष्ट्र विधानसभा,यांचे सचिव, विधानभवन,मुंबई.

४) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय,मुंबई.
५) मा. उपमुख्यमंत्री (न.वि.वि.) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय,मुंबई.
६) मा. उपमुख्यमंत्री (अ.वि.वि.) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय,मुंबई.
७) मा. मंत्री (रोहयो) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई.
८) सर्व मा. मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई.
९) मा. विरोधी पक्षनेता, विधान परिषद/विधानसभा यांचे स्वीय सहाय्यक,विधानभवन,मंबई.
१०) मा. समिती प्रमुख, महाराष्ट्र विधानमंडळ रोहयो समिती, विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
११) मा. मुख्य सचिव यांचे सह सचिव,मंत्रालय,मुंबई.
१२) सर्व अप्पर मुख्य सचिव/ प्रधान सचिव / सचिव, मंत्रालयीन विभाग.
१३) सर्व विभागीय आयुक्त.
१४) महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मुंबई (प्रसिध्दीकरीता).
१५) आयुक्त, महाराष्ट्र रोजगार हमी (विकसित भारत- रोजगार व आजिविका हमी मिशन (ग्रामीण)),योजना, नागपुर.
१६) सर्व जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक.
१७) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद तथा सहजिल्हा कार्यक्रम समन्वयक.
१८) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १ व २, मुंबई व नागपूर.
१९) प्रधान महालेखापाल (लेखा परिक्षा) महाराष्ट्र १ व २, मुंबई व नागपूर.
२०) महासंचालक, महाराष्ट्र रोजगार हमी (विकसित भारत- रोजगार व आजिविका हमी मिशन (ग्रामीण)) योजना, मुंबई.
२१) संचालक अर्थ व सांख्यिकी संचालनालय,मुंबई.
२२) संचालक,सामाजिक वनीकरण,पुणे.
२३) संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष- ग्रामीण गृहनिर्माण,सिडको भवन,बेलापुर,नवी मुंबई.
२४) संचालक, रेशीम संचालनालय,नागपुर.
२५) सर्व विभागीय वन अधिकारी.
२६) सर्व उपसंचालक, सामाजिक वनीकरण.
२७) सर्व सह आयुक्त (रोहयो) / सर्व उपायुक्त (विकास).
२८) सर्व प्रकल्प संचालक,जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा.
२९) सर्व प्रादेशिक उपसंचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा.
३०) सर्व अधीक्षक अभियंता, (जलसंपदा / सार्वजनिक बांधकाम / लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर)
३१) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
३२) सर्व जिल्हा कृषी अधिक्षक.
३३) सर्व जिल्हा रेशीम अधिकारी.
३४) सर्व जिल्हा जलसंधारण/मृदा संधारण अधिकारी.
३५) सर्व उप जिल्हाधिकारी (रोहयो) तथा जिल्हा उप कार्यक्रम समन्वयक.
३६) सर्व उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत/ रोहयो),जिल्हा परिषद.
३७) सर्व तहसलिदार तथा कार्यक्रम अधिकारी.
३८) सर्व गटविकास अधिकारी तथा सह कार्यक्रम अधिकारी.

३९) सर्व कार्यक्रम अधिकारी / सह कार्यक्रम अधिकारी (कृषी,जलसंधारण,मृदासंधारण, समाजिक वनीकरण, सार्वजनिक बांधकाम, रेशीम आणि वने इ.).

४०) सर्व सह सचिव / अवर सचिव/ सहायक संचालक (लेखा) / कक्ष अधिकारी / संशोधन अधिकारी (रोहयो प्रभाग),

४१) सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.

४२) निवडनस्ती रोहयो-६.